**<u>ठळक बातम्या</u>**

- रब्बी पिकांसाठीच्या किमान हमी भावात वाढ करायला केंद्र सरकारची मंजुरी, केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ

- जनधन खातेधारकांना इंटरनेट आणि मोबाइल बँकिंग सुविधा मोफत मिळणार, रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर जैसे थे, आर्थिक वृद्धी दर वाढण्याचाही अंदाज व्यक्त

- राज्यातल्या २४७ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायत निवडणुकीसाठीची प्रारूप मतदार यादी ८ तारखेला प्रसिद्ध होणार

**आणि**

- दिवाळीच्या काळात प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ एसटी महामंडळाकडून रद्द

- **<><><><><>**

रब्बी पिकांसाठी किमान हमी भावात वाढ करण्याला आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने मंजुरी दिली. सर्वाधिक वाढ करडईच्या भावात झाली असून आता त्याला ६०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळेल. त्याखालोखाल मसुराच्या दरात वाढ झाली आहे. मसुराला ३०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळेल. गव्हाला प्रतिक्विंटल १६० रुपये तर बाजरीला १७० रुपये दर वाढवून मिळाला आहे. त्यामुळं गव्हाला २ हजार ४२५ रुपये प्रति क्विंटल आणि बाजरीला १ हजार ९८० रुपये क्विंटल दर मिळेल. हरभऱ्याला २२५ रुपये तर मोहरीला अडीचशे रुपये दरवाढ मिळाली आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या इतर निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - मंत्रीमंडळ कॅप्सूल**

*(डाळींच्या उत्पादनात आत्मनिर्भर होण्यासाठी विशेष अभियान राबवण्याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. याकरता आगामी ६ वर्षांसाठी ११ हजार ४४० कोटी रुपयांची तरतूद असेल. माहिती आणि प्रसारण मंत्र्यांनी या निर्णयाची माहिती दिली. ....*

**होल्ड- बाईट- अश्विनी वैष्णव**

*२०३०-३१ पर्यंत डाळींचं उत्पादन साडेतीनशे लाख टन करण्याचं उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना सुधारित बियाणं, गोदामं आणि खरेदी हमी अशा सुविधा देण्यात येतील. कीटक प्रतिरोधक्षम आणि हवामानातल्या बदलांमधे टिकून राहणाऱ्या डाळींच्या नवीन जातींची लागवड करण्याली प्रोत्साहन दिलं जाईल असं वैष्णव यांनी सांगितलं.*

*केंद्रसरकारी कर्मचाऱ्यांना आणि निवृत्तीवेतनधारकांना ३ टक्के महागाई भत्ता देण्याच्या प्रस्तावाला आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. हा भत्ता गेल्या १ जुलै पासून लागू होणार असून त्याचा लाभ सुमारे एकोणपन्नास लाख वीस हजार कर्मचारी आणि ६८ लाख ७० हजार निवृत्तीवेतनधारकांना होणार आहे.*

*देशभरात ५७ नवीन केंद्रीय विद्यालयं सुरू करण्यासाठी ५ हजार ८६२कोटी रुपयांच्या तरतुदीला आजच्या बैठकीत मान्यता मिळाली. ज्या जिल्ह्यांमधे एकही केंद्रीय विद्यालय नाही तिथं २० केंद्रीय विद्यालय सुरू करणार असल्याची, तसंच आकांक्षित जिल्ह्यांमधे १४, नक्षल प्रभावित भागात २० आणि ईशान्येकडच्या राज्यात ५ केंद्रीय विद्यालयं सुरू होणार असल्याचं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या शाळांसाठी शिक्षकांची ४ हजार ६०० पदं नव्याने निर्माण केली जातील असं सांगून ते म्हणाले की सुमारे ८७ हजार विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल.)*

**<><><><><>**

जनधन योजनेतल्या खातेधारकांना मोबाइल आणि इंटरनेट बँकिंग सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्याची घोषणा रिझर्व्ह बँकेनं केली आहे. पतधोरण आढावा समितीच्या निर्णयांची माहिती देताना गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज मुंबईत ही घोषणा केली. या निर्णयांविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून…

## होल्ड रिझर्व बँक व्हाइस कास्ट

*(रेपो दर साडे ५ टक्के, बँक दर पावणे ६ टक्के आणि स्टँडिंग डिपॉझिट फॅसिलिटी दर सव्वा ५ टक्क्यांवर ठेवायला पतधोरण आढावा समितीनं एकमतानं मंजुरी दिली. खाद्य पदार्थांच्या दरात झालेली घसरण आणि जीएसटीमधल्या कपातीमुळं महागाई आटोक्यात असल्यानं दर कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्याचं  गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले. आगामी काळात महागाई दर घसरुन २ पूर्णांक ६ दशांश टक्के राहण्याचा अंदाजही रिझर्व्ह बँकेनं वर्तवला आहे. चांगला मान्सून, खरीपात चांगली झालेली पेरणी, धरणांमध्ये असलेला पुरेसा पाणीसाठा, जीएसटीच्या दरांमधली कपात यासह इतर अनेक कारणांमुळं देशाचा आर्थिक वृद्धी दर चालू आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिल असा अंदाज रिझर्व्ह बँकेनं वर्तवला आहे. यापूर्वी हा दर साडे सहा टक्के राहिल असं रिझर्व्ह बँकेनं ऑगस्ट महिन्यात म्हटलं होतं. ग्राहकांच्या सोयीसुविधा, बँकिग क्षेत्र मजबूत करणे, कर्ज पुरवठा वाढवणे, व्यवसाय सुलभता, परकीय चलन व्यवहार आणि रुपयाचे आंतरराष्ट्रीयीकरण याला चालना देण्यासाठी रिझर्व्ह बँकेनं २२ नवे निर्णयही आज जाहीर केले. त्यानुसार किमान शिलकीची मर्यादा नसलेल्या बँक खातेधारकांना मोबाइल आणि डिजिटल बँकिंगसह आणखी काही सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत. बँका आणि वित्तीय संस्थांमधले अंतर्गत लोकपाल आणखी सक्षम करण्याच्या सूचना रिझर्व्ह बँकेनं दिल्या आहेत. याशिवाय रिझर्व्ह बँकेची लोकपाल यंत्रणा आणखी सक्षम करुन त्यात ग्रामीण सहकारी बँकांचा समावेश केला जाईल, असं गव्हर्नर म्हणाले. कर्ज पुरवठा वाढावा यासाठी विविध उपायही त्यांनी आज जाहीर केले. त्यानुसार नोंदणीकृत कर्जरोखे आणि समभागच्या बदल्यात मिळणार कर्ज तसंच आयपीओ खरेदीसाठी मिळणार कर्जही वाढणार आहे. बँकांसाठी जाहीर केलेल्या विविध उपाययोजनांमध्ये बेसल ३ नियमात १ एप्रिल २०२७ पासून सुधारणा करणे, याचाही समावेश आहे. भारताबरोबर व्यापार करु इच्छिणाऱ्या भूतान, नेपाळ आणि श्रीलंकेतल्या नागरिकांना या व्यापारासाठी भारतीय रुपयात कर्ज देण्याची परवानगी रिझर्व्ह बँकेनं दिली आहे. सध्या रिझर्व्ह बँक केवळ अमेरिकन डॉलर, पौंड, युरो आणि जपानी येनचे परकीय चलन विनिमय दर प्रसिद्ध करते. आता भारताचा व्यापार असणाऱ्या आणखी काही देशांचे दरही प्रसिद्ध करणार आहे. )*

**<><><><><>**

राज्यातल्या २४७ नगर परिषदा आणि ४२  नगर पंचायतींच्या सदस्यपदाच्या, तसंच थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी, येत्या ८ तारखेला प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यावर येत्या १३ तारखेपर्यंत

हरकती आणि सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी येत्या २८ तारखेला जाहीर केली जाईल, असं राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या ३२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरता सदस्यपदाचं आरक्षण निश्चित करण्यासाठी येत्या १३ तारखेला सोडत काढली जाणार आहे. त्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ते १७ऑक्टोबर या कालावधीत हरकती आणि सूचना दाखल करता येतील. त्यांचा विचार करून 3 नोव्हेंबरला शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केलं जाईल, असं राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

**<><><><><>**

दिवाळीच्या काळात प्रस्तावित असलेली १० टक्के भाडेवाढ एसटी महामंडळानं रद्द केली आहे. या भाडेवाढीतून महामंडळाला ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. मात्र राज्यातली पूरस्थिती लक्षात घेऊन यंदाची भाडेवाढ रद्द केल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नोकरी मिळालेल्या ५ हजार १८७ उमेदवारांना येत्या ४ तारखेला नियुक्तीपत्रं प्रदान केली जाणार आहेत. यामुळे अनुकंपा भर्तीचा एक मोठा अनुशेष संपुष्टात येणार आहे. याचवेळी एमपीएससीद्वारे निवड झालेल्या ५ हजार १२२ उमेदवारांनाही नियुक्तीपत्रं दिली जाणार आहेत. त्यामुळे एकाच दिवशी १० हजार ३०९ उमेदवार शासकीय नोकरीत दाखल होतील.

नियुक्तीपत्रं देण्याचा मुख्य कार्यक्रम मुंबईत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होईल, तर पालकमंत्री आपापल्या जिल्ह्यात नियुक्तीपत्रं वितरित करतील.

<><><><><>

नागपूर ते चंद्रपूर या २०४ किलोमीटर लांबीच्या चारपदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाला मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीनं मंजूरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या वर्षा निवासस्थानी त्यांच्या अध्यक्षतेखाली आज या समितीची बैठक झाली. त्यात हा निर्णय झाला. या प्रकल्पासाठी एकूण २ हजार ३५३ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार आहे. चंद्रपूर ते मुल दरम्यान महामार्ग निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

<><><><><>

उद्या साजऱ्या होणाऱ्या विजयादशमीच्या निमित्ताने विविध राजकीय पक्ष तसंच संघटनांकडून दसरा मेळावे आयोजित करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दसरा मेळावा उद्या नागपूर इथे रेशीमबागेत होत असून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे या मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा उद्या मुंबईत शिवाजी पार्क इथे होत आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे या मेळाव्याला संबोधित करणार आहेत. शिवसेनेचा दसरा मेळावा मुंबईत गोरेगाव इथे नेस्को मैदानावर होणार आहे. दसरा मेळावा हे शक्तिप्रदर्शन नसून शेतकऱ्यांची सेवा असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. बीड इथे भगवान गडावर दसरा मेळावा होणार असून या मेळाव्याला राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे संबोधित करणार आहेत. तर बीड जिल्ह्यातच नारायणगड इथेही दसरा मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं असून या मेळाव्याला मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे उपस्थित राहणार आहेत.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१ सप्टेंबर २०२५ - बुधवार

**<><><><>**

६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी नागपूर दीक्षाभूमी पंचशील ध्वजांनी सजली आहे. काल रात्रीपासूनच देशाच्या कानाकोपऱ्यातून अनुयायांचं आगमन सुरू झालं आहे. त्यांच्यासाठी ठीकठिकाणी भोजनदान, पिण्याचं पाणी, मार्ग दाखवण्यासाठी सूचना फलक, सावलीसाठी मंडप, तसंच रात्रीच्या निवाऱ्याची सोय प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी केली आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण दीक्षाभूमी परिसरात सीसीटीव्ही, वॉच टॉवर आणि पोलिस दलही जागोजागी तैनात केलं आहे. दिक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे कार्यक्रम कालपासूनच सुरु झाले आहेत. मुख्य सोहळा उद्या होणार आहे.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आज दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मध्यवर्ती स्मारकाला अभिवादन केलं.

**<><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत भारताने संकट काळात सीमांच्या मर्यादेपलिकडे जाऊन केलेल्या मदतीविषयी आपण जाणून घेणार आहोत.

**सेवा पर्व कॅप्सूल...**

*(जगभरातल्या विविध देशांना संकटकाळात भारतानं सातत्यानं मदत पुरवली आहे. त्यात साथीच्या आजारांपासून ते नैसर्गिक संकटांचा समावेश आहे. या आपत्तींचं निवारण करण्यासाठी भारताने वेळोवेळी वैद्यकीय मदत, साधनसामग्रीचा पुरवठा आणि तज्ज्ञ मनुष्यबळ यांचा पुरवठा केला आहे. गेल्या पाच वर्षांत भारताने दीडशेहून अधिक देशांमध्ये मानवतेच्या दृष्टिकोनातून मदत पोहोचवली आहे. कोविड काळात भारताने लसींचा पुरवठा केला होता. याविषयी प्रधानमंत्री म्हणाले…*

**होल्ड… प्रधानमंत्री**

*यूक्रेनमधलं ऑपरेशन गंगा, सुदानमधलं ऑपरेशन कावेरी आणि इस्त्रायलमधलं ऑपरेशन अजयपर्यंत भारताने विविध प्रकारे फक्त भारतीयच नव्हे तर परदेशी नागरिकांनाही मदतीचा हात दिला आहे. )*

**<><><><><>**

घातपात घडवून आणण्याच्या उद्देशानं टेहळणी करणाऱ्या एका नक्षल समर्थकाला पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाने गडचिरोली इथून अटक केली आहे. सैनु उर्फ सन्नु अमलु मट्टामी असं त्याचं नाव आहे. सैनु याचा अनेक गुन्ह्यांमध्ये सक्रिय सहभाग आहे. तसंच २७ ऑगस्ट रोजी पोस्टे कोठी हद्दीतल्या कोपर्शी-फुलनार जंगल परिसरात पोलीस आणि नक्षलींमध्ये झालेल्या चकमकीतही त्याचा सहभाग असल्याचं उघड झालं आहे.

**<><><><><>**

अतिवृष्टीमुळे शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांना मदत करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आज बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाईत मोर्चा काढला. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांनी प्रती हेक्टर ५० हजार रुपये मदत करावी, खरडून गेलेल्या जमीनीसाठी अडीच लाख रुपये मदत करावी, शेतमजुरांनी आर्थिक मदत द्यावी, विद्यार्थ्यांचं शालेय शुल्क माफ करावं आदी मागण्या आंदोलकांनी केल्या.

धुळ्यात सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेनं आज मोर्चा काढला. कापसावरील आयात शुल्क पूर्ववत करावं, दूध, सोयाबीन, तूर या पिकांसाठी किमान हमीभाव कायदा लागू करावा, शेतकऱ्यांचं कर्ज माफ करावं, गायरान आणि इतर पडीक जमिनीवरील कसणार्यांचा हक्क मान्य करावा, आदी मागण्या आंदोलकांनी केल्या.

**<><><><><>**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करावं या मागणीसाठी आज नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, तसंच सोलापूर, लातूर आणि वाशिम इथं आंदोलन करण्यात आलं. धनगर आंदोलकांनी मुदखेड इथं रास्तारोको आंदोलन केलं तसंच जालना इथं सुरू असलेल्या दीपक बोराडे यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला. सोलापूर - विजापूर महामार्ग रोखत आंदोलकांनी घोषणाबाजी केली. तसंच लातूर मधे लातूर - अंबाजोगाई आणि वाशिम मधे वाशिम-पुसद मार्गावर चक्काजाम आंदोलन करण्यात आलं.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांच्या सभापतीपदासाठीचं आरक्षण आज जाहीर करण्यात आलं. त्यानुसार पालघर पंचायत समितीचं सभापतीपद इतर मागासवर्ग, वसई, मोखाडा, डहाणू आणि विक्रमगड अनुसूचित जमाती महिला तर तलासरी, जव्हार आणि वाडा पंचायत समिती सभापतीपद अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात, बहुतांश ठिकाणी मराठवाड्यात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**